सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,नांदेड
दूरध्वनी:-०२४६२-२३४६६८ संकेतस्थळ-www.zpnanded.in
ई-मेल: dyceogadzpnanded@gmail.com


जा.क्र/जिपनां/साप्रवि/ आस्था-2अ/ 2585 / 2026 दिनांक: 09/09/ ,2026

**सुचनापत्र**

**विषय:- अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबत तात्पुरती प्रतीक्षासूची प्रसिध्द करणे बाबत.**
**संदर्भ:-** सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक अकंपा/1225/प्र.क्र.102/आठ दिनांक 17 जुलै 2025

शासन सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट-क ते गट-ड मधील कर्मचा-यांच्या कुटुंबातील पात्र वारसास त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्तीची योजना कार्यान्वीत आहे. सदर योजनेंतर्गत नांदेड जिल्हा परिषदेच्या सेवेत कार्यरत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचा-यांच्या ज्या वारसांनी दि.31.08.2026 अखेर या कार्यालयाकडे विहित प्रस्ताव सादर केलेले आहेत, अशाच उमेदवारांचे प्रस्ताव शासन निर्णयातील तरतूदीनुसार व अर्जासोबत सादर केलेल्या परिपुर्ण कागदपत्रांच्या पडताळणीनुसार प्रतीक्षासूचीमध्ये नाव समाविष्ट करुन तात्पुरती गट-क (वर्ग-3) व गट-ड (वर्ग-4) ची प्रतीक्षासूची नांदेड जिल्हा परिषदेच्या www.zpnanded.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदरच्या तात्पुरत्या प्रतीक्षासूचीमध्ये माहे ऑक्टोंबर 2025 मधील अनुकंपा तत्वावरील भरतीमध्ये ज्या उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती देणेत आली,अशा उमेदवारांची नावे कमी करण्यात आलेली आहेत. शासन निर्णयाच्या तरतूदीनुसार ज्या उमेदवारांनी परिपूर्ण अर्ज सादर केलेले आहेत. अशा उमेदवारांची पात्र प्रतीक्षासूची व ज्या उमेदवारांनी अपूर्ण प्रस्ताव सादर केलेले आहेत, अशा उमेदवारांची अपुर्ण यादीतील सर्व उमेदवारांनी सदरहून प्रतीक्षासूचीचे अवलोकन करुन,त्यांच्या नावासमोरील माहितीबाबत काही आक्षेप वा हरकती असल्यास तसेच ज्या उमेदवारांची नावे सदरहू प्रतीक्षासूचीमध्ये समाविष्ट झाली नसल्यास अशा उमेदवारांनी त्यांच्या हरकती दिनांक ---------25/9/26--------- पर्यंत कागदोपत्री पुराव्यासह या कार्यालयाकडे समक्ष सादर करावी.

सदर तात्पुरत्या प्रतीक्षासूचीबाबत विहित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त झालेल्या हरकती /आक्षेपाची छाननी करुन, सदरची तात्पुरती प्रतीक्षासूची अंतिम करुन त्यानुसार अनुकंपा पदभरतीबाबत पुढील कार्यवाही प्रस्तावित करणेत येईल व तद्नंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

नोट :: 01. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र अकंपा-1225 /प्र.क्र.121/म.लो.आ.दि.17जुलै 2025 नुसार अर्ज केलेल्या दिनांका पासुन तिन वर्षाच्या आत पुर्ण करणे आवश्यक आहे,अन्यथा आपले नाव प्रतिक्षायादीतुन वगळण्यात येईल व त्यास आपण स्वत: जबाबदार असाल यांची नोंद घ्यावी.

02. अज्ञान वारसाच्या बाबतीत सज्ञान झाल्यानंतर तिन वर्षाच्या आत अनुकंपा तत्तवावर नोकरी मिळण्यासाठी अर्ज करणे अवश्यक आहे.

03. वरील शासन निर्णयानुसार गट बदलासाठी अर्ज / विकल्प सादर करावा. (फक्त एक वेळेस असा अर्ज करता येईल)

(महेश पाटील,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नांदेड

प्रतिलिपी

01. विभाग प्रमुख (सर्व) जिल्हा परिषद,नांदेड यांना माहितीस्तव व अवश्यकत्या कार्यवाहीस्तव.

02. जिल्हा माहिती अधिकारी,नांदेड

03.गट विकास अधिकारी,पंचायत समिती (सर्व),जि.नांदेड यांना देऊन सुचित करण्यात येते की,आपले अधिनिस्त सर्व कार्यालयांमध्ये सदरची यादी कार्यालयाच्या नॉटिस बोर्ड वर दर्शनी भागात लावण्यात यावी व तसा पंचनामा करून प्रसिध्दीचा अहवाल सादर करावा ,तसेच यादीत नमुद दिवंगत कर्मचारी यांचे वारसांस याबाबत कळविण्यात यावे.

04.संपादक,दैनिक--------------------------------------- नांदेड यांना देवून सुचित करण्यात येते की, सोबतची प्रेसनोट आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रात बातमी स्वरूपात प्रसिध्द करुन सहकार्य करावे ही विनंती.

स्वा/-
(महेश पाटील,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नांदेड